# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर


**P.R.O. Office,Palghar**
phone no 02525-297032,Mo No 8669604078
Address-sp office Bidco Road,Palghar west
E-Mail- propalghar@gmail.com


## प्रेसनोट क्र. ४८४ दिनांक ३०/०५/२०२०

## स्थानिक गुन्हे शाखा, वसई युनिट यांचे पथकाकडुन रेती वाहतुक करणा-या आरोपीत यास अटक करुन ०५,१२,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त

दि.२९/०५/२०२० रोजी १०.४५ वाजता तुळींज पोलीस ठाणे हद्दीतील नालासोपारा पुर्व, संतोष भुवन पेट्रोल पंपासमोर आरोपीत सुरतमल राममिलन राव, वय ४२ वर्षे, रा. बरफपाडा, रुम नं. १३, जय अंबे माता रोड, ता.वसई, जि.पालघर याने स्वत:चे अर्थिक फायद्याकरीता दुय्यम वाहतुक परवाना पावतीमध्ये खडाखोड करुन शासनाची जाणीव पुर्वक फसवणूक करुन त्याचे ताब्यातील ट्रकमध्ये क्रश मिश्रीत गौणखनिज (रेती) भरुन अनधिकृतपणे उत्खनन करुन, पर्यावरणाचा -हास करुन चोरी करुन, वाहतूक करीत असताना मिळून आला. आरोपीत याचे ताब्यातुन १)५,१२,०००/-रु.एक टाटा ट्रक क्रं.एम एच-०४/एफ डी १४८९ मध्ये ०३ ब्रास भरलेली क्रश मिश्रीत गौणखनिज (रेती) २)मा.जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर यांचेकडील एक दुय्यम वाहतुक परवाना पावती असा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन आरोपीत याचे विरुध्द तुळींज पोलीस ठाणे गु.र.नं. I ५४६/२०२० भा.दं.वि.सं.कलम ४२०,३७९ सह पर्यावरण अधि.१९८० चे कलम १५,१९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन सदर गुन्हयातील आरोपीत यास दिनांक २९/०५/२०२० रोजी अटक करण्यात आली आहे.

सदरची कारवाई पोलीस निरीक्षक श्री. रविंद्र नाईक, स्थानिक गुन्हे शाखा, पालघर यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा, वसई युनिटचे अधिकारी व कर्मचारी यांनी केली आहे.